MHAH230006922024

नियमीत दिवाणी दावा क्रमांक २८०/२०२४

मधुकर कारभारी शिंदे
वि.
अशोक कारभारी शिंदे

**निशाणी क्र.२४ वरील आदेश**

[०१] प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींना कैफियत देण्यासाठी झालेला विलंब माफ होऊन मिळण्यासाठी सादर केलेला आहे.

[०२] वादीच्या विद्वान वकिलांनी अर्जाच्या पाठीमागील पानावर म्हणणे सादर करुन अर्जास तीव्र हरकत घेतली.

[०३] अर्जाचे, त्यावरील म्हणण्याचे आणि अभिलेखाचे अवलोकन केले.

[०४] दोन्ही बाजुच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

[०५] प्रस्तुतचा दावा हा वादीने वाटप होऊन निरंतर ताकीद मनाई हुकूम मिळणेबाबत दाखल केलेला आहे. म्हणजेच प्रस्तुतच्या दाव्यात दोन्ही पक्षकारांचे हक्क व अधिकारांचा विषय आहे. यात काही एक शंका नाही की, प्रतिवादी हे प्रस्तुत दाव्यात हजर झाले असून त्यांनी विहीत कालावधीमध्ये कैफियत दाखल केली नाही. प्रस्तुत दावा गुणदोषावर चालविण्यासाठी प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफ होऊन त्यांची कैफियत अभिलेखावर घेणे न्यायोचित होईल. एकुण वर नमुद कारणांचा विचार करता, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

**(१)** अर्ज मंजुर करण्यात येतो.

**(२)** प्रतिवादींना लेखी कैफियत दाखल करण्यास झालेला उशीर माफ करण्यात येत असुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात येते.

**(३)** प्रस्तुतच्या अर्जाचा खर्च प्रतिवादी यांनी सोसावा.

PATIL PRAVIN VISHWAS
Digitally signed by PATIL PRAVIN VISHWAS
Date: 2025.07.28 11:55:54 +0530

श्रीगोंदा.
दिनांक:- २८-०७-२०२५

(प्रविण वि. पाटील)
सह दिवाणी न्यायाधीश,
कनिष्ठ स्तर, श्रीगोंदा.

# :-<u>CERTIFICATE-:</u>

I affirm that, the contents of this pdf file order are same, word for word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Case No. | :- | RCS 280/2024 |
| Name of Stenographer | :- | Smt. N. D. Dawat |
| Court Name | :- | Jt. Civil Judge,<br>J.D.& J.M.F.C, Shrigonda. |
| Date of Decision | :- | 28-07-2025 |
| Order signed by P. O. on | :- | 28-07-2025 |
| Order uploaded on | :- | 28-07-2025 |